MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

maharashtraaarambh@gmail.com

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -८७ शनिवार दि.१६ डिसेंबर २०२३ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -87 SATURDAY DT.16 DECEMBER 2023 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

## गजानन तौर हत्याकांडाला नवीन वळण लागण्याची शक्यता, पोलिसांना वेगळाच संशय

जालना : जालन्यात सोमवारी भरदिवसा मंठा चौफुली परिसरात जालना किंग या नावाने प्रसिद्ध असलेला तरुण गजानन तौर या तरुणाची गोळ्या झाडून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हत्तेनंतर जालना शहरात ''शरीर मिटता है नाम नहीं...'' अशा आशयाच्या होर्डिंग तौर याच्या समर्थकांनी ठिकठिकाणी लावले होते. सोशल मीडियावर देखील तौर याच्या हत्येनंतर अनेकांनी व्हाट्सअप, इंस्टाग्राम आणि फेसबुकवर श्रद्धांजलीचे स्टेटस ठेवले होते. कॉमेंटमध्ये हळहळ व्यक्त होत होती. जालना किंग गजानन तौर याची हत्या का झाली असावी? अशी चर्चा जिल्हाभरात रंगताना दिसत होती, अनेक तर्क लावण्यात येत होते.

# बनावट जात प्रमाणपत्र काढून ढापली कोतवाल पदाची नोकरी!

बीड / प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात एकूण ९ जागेसाठी कोतवाल पदाकरिता अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने निवड प्रक्रिया सप्टेंबरमध्ये पार पडली. त्यामध्ये तालुक्यातील कोतन येथील कोतवाल पदासाठी मोनिका सोपान जाधव यांनी अनुसूचित जातीचे खोटे प्रमाणपत्र काढून कोतवाल पदाची नोकरी मिळवून शासनाची फसवणूक केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर कलम ४२०, ४६७, ४६८ नुसार फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. अशी तक्रार राणी दत्तात्रय साठे यांनी बीड जिल्हाधिकारी, उप विभागीय कार्यालय पाटोदा, तहसीलदार पाटोदा, उप विभागीय अधिकारी बुलढाणा, जिल्हा जात पडताळणी समिती बुलढाणा यांच्याकडे केली आहे.त्यामुळे पाटोदा तालुका कोतवाल भरती वादात सापडली आहे.

कोतवाल पदासाठी मोनिका सोपान जाधव राहणार पाटोदा, जिल्हा बीड यांनी अर्ज केला होता. त्यामध्ये त्यांना कोतन या ठिकाणी कोतवाल पदासाठी नियुक्ती देण्यात आली आहे. सदरील नोकरी त्यांनी अनुसूचित जातीचे खोटे जात प्रमाणपत्र

## मोनिका जाधव हिच्यावर ४२० दाखल करा : तक्रारदार

काढून मिळवली आहे.तरी सदरील नियुक्ती रद्द करुन प्रतिक्षा यादीतील क्रमांक दोनचे उमेदवार राणी दत्तात्रय साठे यांना नियुक्ती देण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनास दिलेल्या तक्रार अर्जात नमूद करण्यात आलं आहे की,मोनिका सोपान जाधव यांनी कोतवाल पदासाठी सादर केलेली कागदपत्रे पूर्णतः खोटी असल्याचे आढळून आले आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणात जिल्हाधिकारी बीड व बुलढाणा जिल्हा प्रशासन यांनी योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी तक्रार देण्यात आली आहे.

### मोठे रॅकेट असल्याची शक्यता?

मोनिका सोपान जाधव यांनी पाटोदा तालुका कोतवाल पदाकरिता दिलेले अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र खोटे आहे. तसे पुरावे सापडले आहेत. मोनिका सोपान जाधव यांच्या जात प्रमाणपत्रावर असलेला अनु क्रमांक, याची खात्री केली असता दुसऱ्या एका व्यक्तीचे नाव त्यावर दिसून येत आहे. त्यामुळे ही फसवणूक असून एक रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### न्याय न मिळाल्यास आंदोलन

बीड जिल्हा प्रशासनानं मोनिका सोपान जाधव या फसवणूक प्रकरणी येत्या सात दिवसाच्या आता मला नियुक्ती न दिल्यास व न्याय न मि ळाल्यास, जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन केलं जाईल. असा इशारा राणी दत्तात्रय साठे यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे.

# परळीतील कॉलेजमध्ये खुलेआम कॉपी

## ढीगभर मोबाईल, खंडीभर चिठ्ठ्या,धक्कादायक व्हिडिओ आला समोर

प्रतिनिधी बीड

बीड: जिल्ह्यातील परळी येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात थेट मोबाइल समोर ठेवूनच कॉपी करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. याशिवाय डमी विद्यार्थी बसवल्याचाही आरोप करण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न परळी येथील नागनाथप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालयातील हा सर्व प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थी करत असलेल्या कॉपीच्या घटनेचं व्हिडीओसह चित्रण करीत परीक्षार्थींचे मोबाइल जप्त करणाऱ्या सहकेंद्रप्रमुखालाच विद्यापीठाच्या परीक्षा संचालकांनी तडकाफडकी बदलून टाकल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सध्या वेगवेगळ्या विभागाच्या परीक्षा सुरु आहेत. दरम्यान, बीड जिल्ह्यात देखील विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयात परीक्षा घेण्यात येत आहे. असे असतांना परळी येथील नागनाथप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालयात चक्क विध्यार्थी मोबाइल समोर ठेवून कॉपी करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेचा भांडाफोड करण्यासाठी एका सहकेंद्रप्रमुखाने सर्व कॉपीच्या घटनेचं व्हिडीओसह चित्रण देखील केले. मात्र, संबंधित विध्यार्थी आणि त्यांना कॉपी करण्यासाठी मदत करणाऱ्यांवर कारवाई न करता हा प्रकार समोर आणणाऱ्या सहकेंद्रप्रमुखाचीच विद्यापीठाच्या परीक्षा संचालकांनी तडकाफडकी बदली केली आहे.

### परीक्षार्थींकडून धमकावण्या देखील आल्या

१२ डिसेंबरपपासून विद्यापीठाच्या अभियांत्रिकीच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. अभियांत्रिकीच्या परीक्षेसाठी परळी येथील नागनाथप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रा. दशरथ रोडे यांची सहकेंद्रप्रमुख म्हणून परीक्षा विभागाने नियुक्ती केली होती. त्यानुसार, रोडे परीक्षा केंद्रावर गेले. दरम्यान, प्रा. रोडे यांनी परीक्षा हॉलमध्य जाऊन पाहणी केली असता पर्यवेक्षकांसमोर विद्यार्थी थेट मोबाइल समोर ठेवून उत्तरपत्रिका लिहीत असल्याचा धक्कादायक प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यांनी या सर्व घटनेचे व्हिडीओ काढले, त्यानंतर विद्यार्थ्यांचे मोबाइल जप्त केले. रोडे यांना काही परीक्षार्थींकडून धमकावण्यात देखील आले. त्यामुळे, त्यांनी या सर्व प्रकरणाची लेखी तक्रार कुलगुरू यांच्याकडे केली आहे.





# परिचर्या प्रशिक्षणार्थींनी सांभाळली आरोग्यसेवेची धुरा

## जुन्या पेन्शनसाठी संप; महसूलचे जिल्ह्यात केवळ सात कर्मचारी

प्रतिनिधी बीड

बीड : जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी गुरुवार (ता.१४) पासून वर्ग तीन व वर्ग चार कर्मचाऱ्यांनी संप सुरू केला. नागरी आरोग्यसेवेतील परिसेविका, अधिपरिचारिकांसह कर्मचारीही संपात सहभागी झाल्याने आरोग्य यंत्रणेवर ताण आला. जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांत केवळ सात कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. त्यामुळे महसूल विभागाची प्रशासन सेवा पूर्णपणे ठप्प होती.

अधिपरिचारिका व परिसेविकास तसेच कर्मचारी संपावर गेल्याने आरोग्ययंत्रणेवर ताण आला. मात्र, कंत्राटी परिसेविका, परिचर्या प्रशिक्षणार्थी यांच्या साथीने आरोग्यसेवा देण्यात आली.जिल्हा रुग्णालयासह अधीनस्थ ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये अशा इतर १८ आरोग्य संस्थांमधील गट क व गट ड संवर्गातील ८५९ अधिपरिचारिका व कर्मचाऱ्यांपैकी ३३८ कर्मचारी व अधिपरिचारिका संपात सहभागी झाल्या.

कंत्राटी परिसेविका, अधिपरिचारिका व जिल्हा रुग्णालय तसेच लोखंडीच्या परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील परिचर्या प्रशिक्षणार्थींची आरोग्यसेवेसाठी नेमणूक करण्यात आली. ताण आला असला तरी संपातही आरोग्यसेवा सुरळीत ठेवण्यात आल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.



अशोक बडे यांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयात गुरुवारी बाह्यरुग्ण विभागात १४०१ रुग्णांची तपासणी, आंतररुग्ण विभागात ३१८ रुग्णांचे प्रवेश, १६ मोठ्या शस्त्रक्रिया, चार छोट्या शस्त्रक्रिया, १२ सिझर व १३ प्रसूती झाल्याचे डॉ. अशोक बडे यांनी सांगितले.

दरम्यान, संपकरी कर्मचाऱ्यांनी जिल्हा रुग्णालयात ठिय्या मांडून घोषणाबाजी केली. जुनी पेन्शन मिळालीच पाहिजे, असे नारे लगावले. जिल्हाधिकारी कार्यालयासह अधीनस्थ ११ तहसील कार्यालये व उपजिल्हाधिकारी कार्यालयांतील एकूण ७९२ कर्मचाऱ्यांपैकी जिल्हाभरात केवळ सात कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांसाठी तात्पुरते शिपाई नेमण्यात आले होते. महसूल विभागाचे प्रशासनिक कामकाज पूर्णपणे ठप्प होते.

महसूलच्या जुनी पेन्शन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांनीही संपात सहभाग घेतला. दरम्यान, संपकरी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर धरणे आंदोलन केले. यात महिला कर्मचाऱ्यांचाही मोठा सहभाग होता.

## नागपूर विधानभवन मोर्चात बीडच्या अडीच हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा सहभाग

प्रतिनिधी बीड

बीड : राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, मानधनात वाढ करावी, या प्रमुख मागण्यांसाठी ४ डिसेंबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. संपाच्या ११ व्या दिवशीही तोडगा निघाला नसल्याने शुक्रवारी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाच्या वतीने नागपूर विधान भवनावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात बीड जिल्ह्यातील २ हजार पाचशे अंगणवाडी कर्मचारी सहभागी झाल्या होत्या.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा म्हणून ४ डिसेंबरपासून संप सुरू असल्याने मागील ११ दिवसांपासून बीडसह राज्यातील अंगणवाड्या बंद आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील १ लाख ७८ हजार



बालके खाऊपासून वंचित आहेत. पर्यायी व्यवस्था करण्याचे आदेश शासनाने बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले आहेत. मात्र त्यांनी कसलेही नियोजन केलेले नाही. संप मागे घेण्यासंदर्भात शासनानेही तोडगा काढला नसल्याने गेल्या ११ दिवसांपासून संप सुरूच आहे.



### साखर संघाने ऊसतोडणी मजुरांच्या भाव वाढीची जिम्मेदारी आता ऊसतोड कामगार नेते पंकजाताई मुंडे साहेब यांच्या वरती सोपवली

काल दिं . १४/१२/२०२४. साखर संकुल पुणे येथील ऊसतोड दरा विषयी असणारी बैठक निष्फळ सर्व ऊसतोड मजूर मुकादम वाहतूकदार संघटना व साखर संघ यांच्यातील करार संपुष्टात आलेला आहे त्यामुळे कालची चौथी बैठक निष्फळ या बैठकीसाठी साखर संघाचे अध्यक्ष पि आर पाटील जयप्रकाश दांडेगावकर मा हर्षवर्धन पाटील संचालक मंडळ व सर्व ऊसतोड संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते सर्व संघटना ५०/टक्के वाढीवर ठाम आहेत तर साखर संघ २७/टक्के वाढ देऊ म्हणतात सर्व संघटनांनी दिं २५/१२/२०२३पर्यंत न मिटल्यावर महाराष्ट्र राज्यातील सर्व ऊसतोड मजूर ऊसतोड बंद करून संपावर जातील असा इशारा सर्व संघटनांनी साखर संघाला दिलेला आहे

# ज्ञानराधाने ज्ञान दिले, ठेवीदारांवर दुहेरी संकट

## आर्थिक व्यवहार ठप्पच : पैशांअभावी हजारो ठेवीदारांचा जीव टांगणीला





प्रतिनिधी बीड

बीड : आर्थिक क्षेत्रातील आघाडीच्या ज्ञानराधा मल्टिस्टेट को - ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीकडून ठेवीदारांना पैशासाठी तारखांवर तारखा दिल्या जात आहेत. पैसे मिळण्याच्या तारखेची वाट पाहणाऱ्या ठेवीदारांचा जीव टांगणीला आहे. तर, साईराम अर्बन मल्टिस्टेटकडूनही ठेवीदारांना 'आर्थिक नियोजन होत आहे, थोडं थांबा', एवढाच निरोप दिला जात आहे.तिरुमाला ग्रुपची ऑक्टोबर महिन्यात आयकर विभागाने तपासणी केली. त्यानंतर तिरुमालाचे प्रमुख सुरेश कुटे अध्यक्ष असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेट क्रेडीट को - ऑपरेटीव्ह सोसायटीच्या विविध शाखांतून पैसे काढण्यासाठी ठेवीदारांची झुंबड उडाली. सुरवातीला काही ठेवीदारांना ठेवी मिळाल्या. नंतर विस्कटलेली आर्थिक घडी अद्याप बसलेली नाही. जिल्ह्यासह राज्यभरात ५० शाखांचे जाळे, साडेसहा लाख खातेदार व तीन हजार कोटींहून अधिक ठेवी असा व्यवहार असलेल्या या मल्टिस्टेटचे अर्थचक्र दोन महिन्यांपासून थंड आहे.

दरम्यान, सुरवातीपासून ग्राहक व ठेवीदारांना विश्वास देणाऱ्या या मल्टिस्टेटचे प्रमुख सुरेश कुटे यांनी दिवाळीच्या तोंडावर त्यांच्या १४ हजार कोटी रुपयांचे बाजार असलेल्या द कुटे समुहाचे ४५०० कोटी रुपयांचे स्टेक दुबईच्या रॉयल फॅमिलीला विकले असून या व्यवहारातील ३०० कोटी रुपयांची रक्कम डिसेंबरच्या सुरवातीपर्यंत मिळणार असल्याचे सांगितले होते. १५ तारखेपासून मल्टिस्टेटचे व्यवहार सुरळीत होतील व उर्वरित रक्कम जसजशी हाती येईल, तसतसे ठेवीदारांना पैसे देणार असल्याचे ते म्हणाले होते.

### बीड शहरातील व्यवहारांवरही परिणाम

द कुटे समुहाचे केंद्र बीड असल्याने ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या बीड शहर व जिल्ह्यातील शाखांतून नित्याचे आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर होते. रिअल इस्टेट, व्यवसायिकांच्या उलाढालीचे हे आर्थिक केंद्र बंद पडल्याचा परिणाम शहरांतील व्यवहारांवर झाला आहे. रिअल इस्टेटचे व्यवहारही मंदावले आहेत..

### भाजप प्रवेश करूनही फायदा होईना

सुरेश कुटे, त्यांच्या पत्नी व कुटे समुहाच्या कार्यकारी संचालिका अर्चना कुटे, मुलगा आर्यन यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाला द कुटे समुहाच्या समभागांची विक्री आणि आयकर, ईडी हे कारण देखील आहे. मात्र, या घडामोडींना महिना लोटूनही ग्राहकांना अद्याप आपल्या पैशांसाठी वाट पहावी लागत आहे. हातावर पोट असणारे, गंभीर व अत्यावश्यक शस्त्रक्रिया करावयाची गरज असलेल्या ग्राहकांना खेटे मारावेच लागत आहेत. आता पुन्हा २० तारखेपर्यंत पैसे मिळून व्यवहार सुरू होतील, असे सांगण्यात येत आहे.

स्वर्गीय पोलीस हेडकॉन्स्टेबल भारत अंबादास शिंदे यांच्या जयंतीनिमित्त

# संस्कृती विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप व फळे वाटप कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी । बीड

बीड येथील प्रसिद्ध उद्योजक जय भवानी ग्रुपचे सर्वेसर्वा श्री .रुपेशजी शिंदे यांनी त्यांचे वडील स्वर्गवासी पोलीस हेडकॉन्स्टेबल भारत अंबादास शिंदे यांच्या जयंतीनिमित्त संस्कृती विद्यालयामधील २७० विद्यार्थ्यांना केळी ,जिलेबी व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले .श्री .रुपेशजी शिंदे सरांची ही कृती इतरांना मार्गदर्शक आहे .यावेळी




प्रथम संस्थेचे अध्यक्ष डॉ .दत्ता नलावडे यांनी रुपेशजी शिंदे यांचे संस्थेच्या वतीने स्वागत केले .नुकत्याच झालेल्या साप्ताहिक चाचणी परीक्षेत प्रथम आलेले विद्यार्थी समर्थ जानवळे , आदर्श मुंडे ,सोहम महारनवर ' ,सुमित नरवडे ,आदित्य कोकाटे ,अमर कोकाटे ,यश साळवे ,दत्ता चौरे ,अमर कदम ,विशाल बोरसे या विद्यार्थ्यांना शिंदे सर यांच्यातर्फे चित्रकला साहित्य देऊन त्यांना प्रेरणा देण्यात आली व मुलांचे कौतुक करण्यात आले . इतर विद्यार्थ्यांना पण शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले . तसेच सर्व विद्यार्थ्यांनी जिलेबी आणि केळीचा आस्वाद घेतला . बाळ गोपाळांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून मनस्वी समाधान वाटले अशी प्रतिक्रिया श्री शिंदे सरांनी यावेळी व्यक्त केली .शेवटी डॉक्टर दत्ता नलावडे सर यांनी शिंदे सरांचे आभार मानले .दरवर्षी जयंतीनिमित्त शिंदेसर संस्कृती विद्यालयात येऊन मुलांना अशा प्रकारे मदत करत असतात .

# बालेपीर इदगाह रोड व नालीचे काम मंजूर करा



## पीआरपीची जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी

प्रतिनिधी । बीड

बीड शहरातील बालेपीर इदगाहकडे जाणारा रस्ता हा खराब असुन सगळीकडे खड्डे पडले आहेत, सर्वसामान्य जनतेला दुचाकी वाहाने तसेच फोर व्हीलर वाहने जाऊ शकत नाही. त्यामुळे इदगाहकडे रस्त्यांनी जाने अवघड झालेले आहे. या रस्ताच्या कामाकडे सर्वांनी दुर्लक्ष केलेले आहे, तरी सदरील रस्ता व नालीचे काम मंजुर करुन लवकरात लवकर एक महीन्यात करण्यात यावे नसता नगर परिषद बीड समोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी व नगरपरिषद सीईओ यांना देण्यात आले आहे. या शिष्टमंडळात शहराध्यक्ष शेख फिरोज , शेख निसार, शेख माझेद, शेख मोजीब ,फैज मोहम्मद खान उर्फ पापा भाई, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नव्या शोधात या काव्यसंग्रहाला एक वर्ष पूर्ण

नमस्कार,

रसिक वाचकांना मी कवी लेखक राहुल दादा शिंदे आपल्या सर्वांच्या आवडीच्या काव्यसंग्रहाचा लेखक म्हणजेच नव्या शोधात या काव्यसंग्रहाचा लेखक. अर्थात आज नव्या शोधात या काव्यसंग्रहाला प्रकाशित होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे. जीवनात जगत असताना जीवन कसं सुंदर होईल याकडे माणूस लक्ष देत असतो. जीवनाला सुंदर करण्याची जादू ही आपल्या स्वतःच्या हातात आहे. मी सातवीत असताना माझ्या काव्य प्रवासाची सुरुवात केली. तोडक्या मोडक्या शब्दांची छोटी छोटी कविता लिहून मी कवितेचा प्रवास चालू केला. असं म्हटलं जातं अनुभवातून माणूस खूप शिकतो. मी माझ्या अनुभवातून माझ्या कवितेला साकार करतो असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. कोरोना काळामध्ये म्हणजेच लॉकडाऊनच्या थप्प झालेल्या जगात मी माझं स्वतःचं विश्व तयार केला. मी माझ्या लिखाणावर भर दिला. जे पुस्तक मला भेटतात किंवा जे लेख मला वाचता येतात ते मी वाचण्याचा प्रयत्न केला. लॉकडाऊन च्या काळामध्ये मी अशा अनेक कविता लिहिल्या. फक्त कविता लिहून त्या कविता होत नाही. त्या कवितांचे ठसे वाचकांच्या मनात पोहोचणे म्हणजेच ती पूर्णतात झालेली कविता. कधी विचारही केला नव्हता की स्वतःच एक पुस्तक असेल पण वयाच्या १८ वर्षाच्या आधी स्वतःच पुस्तक असावं हे मात्र स्वप्नात पाहत होतो. मी डोळ्यासमोर पाहिलेले ते स्वप्न मी सत्यात उतरवलं. आज नव्या शोधात या काव्यसंग्रहाला वाचकांनी उदंड असा प्रतिसाद दिला. गावातल्या ,खेड्यातल्या, शहरातल्या अशा प्रत्येक ठिकाणातून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मला वाचकांचा लाभला. माझा वाचक हा फक्त शिकलेलाच आहे असे काही नाही. माझा वाचक हा वाचता न येता सुद्धा दुसऱ्याकडून वाचून घेत कविता समजून घेणार आहे. ही बाब सुद्धा मला माझ्या वाचकांकडूनच कळाली.




नव्या शोधात हे नाव पुस्तकाला देण्यामागे खूप मोठा उद्देश आहे. लॉकडाऊन च्या काळामध्ये प्रत्येकालाच असं वाटत होतं की कधी लॉकडाऊन जमतय आणि नवी दिशा भेटते. त्या काळात मी लावलेला कवितेचा शोध म्हणजेच मी निघालेल्या कवितेच्या शोधात म्हणजेच मी लिहिलेल्या नव्या शोधात. या पुस्तकाला आपण सर्वांनी उदंड असा प्रतिसाद मला दिला त्याबद्दल मी सर्व रसिक वाचकांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

असाच प्रतिसाद इथून पुढेही ज्ञान हीच अपेक्षा या लेखणीतून व्यक्त होऊन पूर्णविराम देतो.

राहुल दादा शिंदे
मांडवगण फराटा, पुणे

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायदे रद्द करा डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

सततची नापिकी, शेती मालाला भाव नसणे आदि कारणांमुळे राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असुन राज्य सरकारने विधिमंडळांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्याची कबुली देत जानेवारी २०२३ ते ३१ आक्टोबर २०२३ या १० महिन्याच्या कालावधीत महाराष्ट्रामध्ये २४७८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असुन मराठवाडा विभागात गेल्या ११ महिन्यात १ हजार शेतकऱ्यांनी तर गेल्या ११ महिन्यात बीड जिल्ह्यातील २५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे मुळ कारण शेतकरी विरोधी कायदे हेच असुन कमाल शेतजमीन धारणा कायदा(सीलिंग), जमीन अधिग्रहण कायदा, आवश्यक वस्तु कायदा हेच असुन शेतकऱ्यांचा गळफास सोडवण्यासाठी शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत अशी मागणी किसान पुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, प्रधान सचिव यांना केली असुन आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन दिले आहे.

शेतकरी आत्महत्यांच्या बातम्या दररोज कानावर पडु लागल्या आहेत.माझ्या डोळ्यासमोर झाडाला लटकलेले प्रेत,जळणा-या चितेच्या ज्वाला,विधवा तरूणी लेकराला कडेवर घेऊन शुन्यात बघत उभी राहिलेली,खुंटीला लटकलेल्या सद-याकडे एकटक पाहत बसलेला बाप,लेकीचे कावरे बावरे डोळे,विलाप करणारी आई अशी अनेक चित्रे भिरभिरत असुन हटता हटत नाहीत.या आत्महत्या थांबल्या पाहिजेत यासाठी शेतकरी विरोधी कायदे रद्द करणे गरजेचे आहे.म्हणुन शासन दरबारी पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून शासन दरबारी नोंद असलेल्या साहेबराव करपे यांच्या स्मृतीदिनी १९ मार्च रोजी एकदिवसीय उपवास करणार आहे. ईतरांनीही सहभाग नोंदवावा.



# चिंचखंडी येथे भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आ. नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या हस्ते संपन्न झाले

प्रतिनिधी । केज

या वेळी उपस्थित मा.श्री.मधुकरराव काचगुंडे, मा.श्री. बालासाहेब शेप,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मा.श्री. लक्ष्मण करणर, मोरेवाडीचे सरपंच मा.श्री.औदुंबर मोरे, साकुडचे सरपंच मा.श्री. अब्दुल शेख, काळवटीचे सरपंच मा.श्री. भाऊसाहेब राठोड, कुरणवाडीचे सरपंच मा.श्री. बलभीम कुंडगर, जोगाईवाडीचे सरपंच मा.श्री. बाळासाहेब दोडतले, राजेवाडीचे सरपंच मा.श्री. विलास काचगुंडे, राक्षसवाडीचे सरपंच मा.श्री. राम कांबळे, माजी सरपंच मा.श्री.सतीश गडदे,मा.श्री. कुणाल लोमटे, ममदापूरचे उपसरपंच मा.श्री. बन्सी बागवाले, ग्रामपंचायत सदस्य मा.श्री. कृष्णा हेगडकर, शेपवाडीचे युवक नेते मा.श्री.चंद्रकांत शेप, येल्डा माजी सरपंच मा.श्री.बाबुराव सोन्नर,मा.श्री. संभाजी शिंदे, मा.श्री.बाळासाहेब खोडवे पाटील, चिचखंडी येथील सरपंच माजी सरपंच व परिसरातील युवक उपस्थित होते.

# तहसील कार्यालय आवारातील दलालांना तात्काळ बाहेर हाकलून द्यावा नसता आम्हाला पण व्यवसायासाठी परवानगी द्या सामाजिक कार्यकर्ते प्रमोद गर्जे यांची मागणी

प्रतिनिधी । पाटोदा

पाटोदा तहसील कार्यालय आवारात खाजगी व्यक्ती कम्प्युटर व इतर उपकरणे घेऊन मोठ्या थाटात तहसील कार्यालय आवारात कामकाज करत असल्यामुळे ग्रामीण भागातील व बाहेर गावावरून आलेल्या नागरिकांना आम्हीच कार्यालयातील कर्मचारी असल्याचा आव आणणाऱ्या खाजगी दलालामुळे सर्व सामान्य नागरिकांची प्रचंड अर्थिक लुट होत आहे.

तसेच हे खाजगी दलाल तहसील कार्यालयातील सामान्य नागरिकांची स्टेम्प,तिकीट व इतर कामे करुन घेताना प्रचंड अर्थिक लुट करीत असल्यामुळे बीड जिल्हाधिकारी मॅडम व उपविभागीय अधिकारी पाटोदा तालुका यांनी तहसील कार्यालय आवारात विशेष लक्ष देऊन पाटोदा तहसील कार्यालय आवारातील खाजगी दलालांना तात्काळ तहसील कार्यालयाच्या आवाराच्या बाहेर हाकलून देण्यात यावे नसता पाटोदा तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना तहसील कार्यालय आवारात संगणक व इतर उपकरणे घेऊन व्यवसाय करण्यासाठी परवानगी द्यावी नसता लोकशाही पद्धतीने



सुशिक्षित बेरोजगार युवक व सर्व सामान्य नागरिकांना सोबत घेऊन पाटोदा तहसिल कार्यालयाच्या दारात लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद गर्जे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे

# मनोज जरांगेंची १०० एकरमध्ये होणार इशारा सभा



## पाच लाख लोकांच्या उपस्थितीचे नियोजन ४० एकरमध्ये होणार पार्किंगची व्यवस्था

बीड । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी सरकारला २४ डिसेंबर २०२३ शेवटची तारीख दिलेली आहे. त्या पूर्वसंध्येला बीडमध्ये २३ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता छत्रपती संभाजी महाराज चौक, बीड बायपास मांजरसुंबा रोड येथे ५० एकरमध्ये मनोज जरांगे पाटलांची इशारा सभा होणार आहे. या ठिकाणी ४० एकरमध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

या नियोजनासाठी शुक्रवारी दुपारी शहरातील सूर्या लॉन्स येथे सकल मराठा क्रांती जिल्हा बीडची बैठक संपन्न झाली. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटलांनी २४ डिसेंबर २०२३ ची सरकारला शेवटची मुदत देऊन सराटी आंतरवाली येथील उपोषण मागे घेतले होते. त्या मुदतीच्या पूर्वसंध्येला बीडमध्ये इशारा सभा बीड सकल मराठा समाजाच्या वतीने घेण्यात येत आहे. या सभेला ५ लाख मराठा बांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.बीडमध्ये आतापर्यंत मनोज जरांगे पाटलांनी चार टप्प्यात विविध ठिकाणी सभा घेतल्या. त्यामध्ये पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यातील गावागावात भेटी अन् सभा झाल्या. तिसर्या टप्प्यात जिल्ह्यात ६ तर चौथ्या टप्प्यात चार ठिकाणी मोठ्या सभा घेण्यात आल्या. मात्र त्या सभा, सर्कल, तालुक्यापुरत्या मर्यादीत होत्या. २३ डिसेंबरची बीड जिल्ह्याची आणि इशारा सभा होत आहे.

सुरूवातीला नगर रोडवरील नारायणगड संस्थान वसतीग्रह,काकडहिरा ही जागा निश्चित नाही. करण्यात आली होती. त्यानंतरचऱ्हाटा फाटा येथील जागेचीही पाहणी करण्यात आली मात्रशुक्रवारी सायंकाळी बीड बायपासवरील छत्रपती संभाजीमहाराजचौक, हे ठिकाण निश्चित करण्यात आले.

# बीड हल्ला, जाळपोळीनंतर ४६ दिवसांनी 'एसआयटी' स्थापनेची विधानसभेत घोषणा

## आमदार प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागरांच्या घरावर झाला होता हल्ला

**नागपूर । प्रतिनिधी**

**३० ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके, शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या घरावर मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हल्ला झाला होता. आंदोलकांनी जाळपोळ केली होती. त्याची एसआयटी (विशेष तपास पथक) मार्फत चौकशी करण्याची घोषणा ४६ दिवसानंतर म्हणजे १५ डिसेंबर रोजी विधानसभेमध्ये गृहमंत्री, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. एसआयटीची स्थापना दोन दिवसांनी होईल, असे त्यांनी सांगितले.**

या प्रकरणावरील चर्चेत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी फडणवीसांची शाब्दिक चकमकही झाली. हल्लेखोरांविषयी सहानुभूती दाखवली तर महाराष्ट्रात कोणत्याही लोकप्रतिनिधीच्या घरावर हल्ला होईल, असेही फडणवीस म्हणाले. त्यामुळे या घटनेकडे राजकारणाच्या पलीकडे जाऊन बघण्याची गरज आहे. पोलिस यंत्रणा कारवाई करत होती. पोलिसांमुळेच अधिक नुकसान होऊ शकले नाही. मात्र पोलिस यंत्रणा कमी होती हे मान्य आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. आमदार संदीप क्षीरसागर यांनी ही लक्षवेधी उपस्थित केली होती. माझे घर ८ तास जळत होते तेव्हा पोलिस कुठे होते, असा सवाल क्षीरसागर यांनी उपस्थित केला. न्यायालयीन चौकशीचीही मागणी केली.

अधीक्षक का गेले नाही?

जयंत पाटील म्हणाले की, एवढा मोठा हल्ला होऊनही इंटेलिजन्स विभागाला कळू नये यात आश्चर्य आहे. बीडमध्ये काही होणार आहे, अशी माहिती आधीच देण्यात आली होती. त्यामुळे हलगर्जीपणा झाला आहे यात शंका नाही. जाळपोळ करणाऱ्यांच्या जमावात सराईत गुन्हेगार सापडले असे पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र हे आधी लक्षात आले नाही का. बीड शहर जळत असतानाही जिल्हा पोलिस अधीक्षक बीडला गेले नाही. घटनास्थळी पोलिसांची संख्या कमी असल्याचा दावा केला. पण त्यात काही तथ्य नाही, असेही ते म्हणाले.

या प्रकरणात २७८ आरोपींना आतापर्यंत अटक झाली. यातील ३० आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. माजलगाव घटनेत ४० तर बीडच्या घटनेत ६१ गुन्हेगार फरार आहेत. व्हॉट्सअ‍ॅप मेसेजेस, मोबाइल लोकेशनसह इतर पुरावा आढळलेल्यांना अटक केली आहे. असे हल्ले करणे हे नियोजित आहे का, या हल्ल्यामागचे मास्टरमाइंड कोण आहेत याचाही शोध घेतला जाईल. गुप्तचर यंत्रणेकडून हल्ल्याची कोणतीही माहिती नव्हती, असे फडणवीस म्हणाले.

जयंत पाटील म्हणाले, हा हिंसाचार गुप्तचर यंत्रणांचे अपयश आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बपीडच्या पोलिस अधीक्षकांना जिल्ह्यात काहीतरी होऊ शकते असा इशारा देण्यात आला होता. त्यांना यासंबंधीची माहिती देण्यात आली होती. पण त्यांनी हलगर्जीपणा केला. सोळंकेंचे घर पेटवण्यात आले. त्यावेळी तिथे पोलिस उपस्थित असल्याचे व्हिडिओत दिसत आहे. पोलिस लोकसंख्येच्या तुलनेत नेहमीच कमी असतात. जमाव ५ हजारांचा असला तरी पोलिस ५० असतात. त्यांनी हल्लेखोरांना घाबरवण्यासाठी हवेत गोळीबार का केला नाही? पालकमंत्र्यांनी मागणी करूनही एसआयटी का स्थापन झाली नाही. या प्रकरणातील एक आरोपी पप्पू शिंदे एका राजकीय पक्षाच्या नेत्याचा भाचा आहे. शिंदेंचे कुणाशी साटेलोटे आहे हे सांगावे. त्यावर फडणवीस म्हणाले की, तुम्ही शिंदेची विचारणा करता. मग सूरज चुंगडे (शिंदेसेना) कोण आहे. शिराळे कोण आहे?

# बायकोच्या जाचाला कंटाळून नवऱ्याने घेतलं विष

## सासूरवाडीतच संपवलं जीवन, बीडमधील धक्कादायक घटना

बीड - मुलीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी सासूरवाडीत आलेल्या जावयाने बायकोच्या तसेच सासरकडील मंडळींच्या त्रासाला कंटाळून विषारी द्रव्य प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवली. ही धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील बाभळगाव येथे घडली. याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात दिंद्रुड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नितीन विनायक शेळके वय ३२ रा. लोणी, ता. परतूर जि. जालना असं मयत जावयाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, नितीन शेळके याचा विवाह माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र बाभळगाव येथील रूपाली रुस्तुम सुरवसे हिच्यासोबत २०२० साली झाला होता.

६ महिन्यांच्या सुखी संसारानंतर पती-पत्नीमध्ये वाद सुरू झाला. पत्नी रुपालीने पती नितीकडे वेगळे राहण्यासाठी तगादा लावला होता. तसेच शेत वाटून घे म्हणून पत्नी व सासरची मंडळी त्याला वारंवार मानसिक त्रास द्यायची.





# मुद्रांक विक्रेते प्रभाकर पाटील पिंपळनेरकर यांचे दु:खद निधन

प्रतिनिधी बीड

पेठ बीड भागातील गांधीनगर परिसरात राहणारे प्रसिद्ध मुद्रांक विक्रेते प्रभाकर भाऊसाहेब पाटील पिंपळनेरकर यांचे अल्पशा आजाराने शनिवार दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ८ वाजता खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना दुःखद निधन झाले. दुपारी त्यांच्या पार्थिवावर मोंढा परिसरातील मुक्तिधाम स्मशानभूमी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



पेठ बीड भागातील मन्मथ स्वामी कॉलनी, गांधीनगर परिसरात मागील ४० वर्षापासून वास्तव्यास असलेले प्रसिद्ध मुद्रांक विक्रेते प्रभाकर भाऊसाहेब पाटील पिंपळनेरकर हे नेहमीप्रमाणे घरात असताना १३ डिसेंबर रोजी त्यांना अचानक चक्कर आली.चक्कर आल्यामुळे ते खाली डोक्यावर पडले. त्यांना तात्काळ बीड शहरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन दिवसापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते.शनिवार दिनांक १६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ८ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर मोंढा परिसरातील मुक्तिधाम स्मशानभूमी येथे दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.ते मूळ पिंपळनेर गणपतीचे येथील रहवाशी होते.त्यांच्या अचानक निधनाने पाटील आणी पिंपळनेर पंचक्रोशीत दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## आयुष इंटरनॅशनल मेडिकल असलोसिएशन च्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदावरती डॉ. असलम शेख यांची निवड

प्रतिनिधी बीड

डॉ असलम शेख मागील चार वर्षांपासून विविध संघटना आणि फॉउंडेशन च्या डॉ. सेल लीगच्या विविध पदावर मध्ये काम करत आले आहे.



मात्र आता त्यांची निवड महाराष्ट्र स्टेट प्रेसिडेंट म्हणुन आयुष मेडिकल संघटना मध्ये झाली आहे. एम यु एच एस म्हणेज महाराष्ट्रा युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स मध्ये येणाऱ्या सर्व मेडिकल कॉलेज मधील विध्यार्थी वर्गात त्यांची एक चांगली ओळख आहे. पहिल्यापासून सर्व पॅथी ला सोबत घेऊन ते काम करत आले आहे. त्याच बरोबर राष्ट्रीय अध्यक्ष आयुर्वेद डॉ. भूषण नागरे सर यांच्या कडुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत

# केंद्रिय पथकाचा दुष्काळ पाहणी दौरा

## हिवरसिंगा ,खोकरमोहा रायमोहा येथिल तलाव पिकांची केली पाहणी

प्रतिनिधी शिरूर कासार

यावर्षी अल्प प्रमाणात पाऊस झाल्याने पिकांची वाढ खुंटुन उतपन्नात मोठी घट झाली आहे.तर पाणीसाठा नसल्याने पिण्या बरोबरच जनावरांचेही डिंसेबर अखेल मोठे हाल होणार आहे.सरकारने पाठीमाघेच दुष्काळ जाहीर केला आसला तरी त्या अणुषंगाने काही ठोस ऊपाय योजना होताना दिसुन येत नाहीत.गुरुवारी केंद्राचे पथक दुष्काळ परीस्थिती पाहणी करण्यासाठी शिरुर तालुक्याच्या दौर्यावर आले होते.

या दौर्यामध्ये केंद्रातील अधिकारी होते.यावेळी त्यांनी प्रथम हिवरसिंगा येथिल तलावाची पाहणी केली. तलावामध्ये घोटभरही पाणी शिल्लक नसल्याचे प्रत्यक्ष दर्शणी दिसुन आले.त्याचबरोबर हिवरसिंगा-मलकाचीवाडी रोडवरील वसंत माखले यांच्या तुर पिकाची पाहणी करुन शेतकर्यांशी संवाद साधला.तसेच हिवरसिंगा-खोकरमोहा रोडवरील केशरबाई डोंगरे यांच्या ऊसाची तर अक्षय डोंगरे यांच्या कपाशीची पाहणी करण्यात आली.यावेळी पाऊसच नसल्याने ऊस हा ज्वारीच्या ताठासारखा



पोसल्याचे दिसुन आले.तर कपाशी हे पिक गडघ्याच्या खाली आलेले आहे.यामुळे उत्पन्नात जवळपास मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे वरील शेतकर्यांनी सांगितले.तसेच खोकरमोहा येथील हिवरसिंगा- खोकरमोहा रोडवरील तलाव व ग्रामपंचायत पाणीपुरवठा वीहीर,परमेश्वर भागवत मिसाळ यांचा ऊस,अर्जुन मिसाळ यांची तुर,विक्रम मिसाळ यांचे आंबा फळपिक वा ज्वारी पिकाची पाहणी केली.तसेच इत्तरही काही शेतकर्यांच्या पिंकाची पाहणी केली.तसेच खोकरमोहा ते रायमोहा रोडवरील कापुस पिकाची पाहणी करुन वारणी येथील तलावाची पाहणी करण्यात आली.यावेळी शेतकर्यांनी पथकातील अधिकार्यांना पिण्याच्या पाण्या बरोबरच पशुधनाच्याही समस्यांचा पाढा वाचला व उत्पन्नात घट झाल्याने शासनाने शेतकर्यांना मोठ्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली.यावेळी नीती आयोग संशोधन अधिकारी एसपी मीना, केंद्रीय ग्रामीण पाणीपुरवठा सहाय्यक आयुक्त मोतीराम, केंद्रीय कृषी कार्यालयाचे मनोज कुमार यांच्यासह बीडचे उपविभागीय अधिकारी ,बीडचे कृषि उपसंचालक बाळासाहेब नितनवरे,उपविभागीय कृषि अधिकारी संगेकर,समन्वयक अधिकारी संदीप चाकने,तहसिलदार विपीन पाटील,ना.तहसिल बाळासाहेब खेडकर,गटविकास अधिकारी केंद्रे,पशु वैद्यकिय अधिकारी डा.प्रदिप आघाव,जी.बी.राठोड,साळवी,कृषि मंडळ अधिकारी घसिंग,कृषि सहहयाक संदीपान जाधव,ग्रामसेवक संघटनेचे तालुका अध्यक्ष अशोक मिसाळ,मंडळ अधिकारी शरद शिंदे,शहादेव सानप,तलाठी जयश्री बांगर,कृषिचे सुपर वायझर संजय फरताडे,लिंबाजी काटकर व परिसरातील शेतकरी नागरिक आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलीच्या वाढदिवसासाठी सासरवाडीला आलेल्या जावयाने विष पिऊन केली आत्महत्या

प्रतिनिधी बीड

मुलीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी सासूरवाडीत आलेल्या जावयाने बायकोच्या तसेच सासरकडील मंडळींच्या त्रासाला कंटाळून विषारी द्रव्य प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवली. ही धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील बाभळगाव येथे घडली. याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात दिंद्रुड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



नितीन विनायक शेळके वय ३२ रा. लोणी, ता. परतूर जि. जालना असं मयत जावयाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, नितीन शेळके याचा विवाह माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र बाभळगाव येथील रूपाली रुस्तुम सुरवसे हिच्यासोबत २०२० साली झाला होता.६ महिन्यांच्या सुखी संसारानंतर पती-पत्नीमध्ये वाद सुरू झाला. पत्नी रुपालीने पती नितीकडे वेगळे राहण्यासाठी तगादा लावला होता. तसेच शेत वाटून घे म्हणून पत्नी व सासरची मंडळी त्याला वारंवार मानसिक त्रास द्यायची.दरम्यान, दुसऱ्या बाळंतपणासाठी रुपाली माहेरी बाभळगाव येथे आली होती. त्यांची मोठी मुलगी नेहा हिचा वाढदिवस असल्याने नितीन सासरवाडीला आला होता. यावेळी पत्नीने त्याच्याशी किरकोळ कारणावरून वाद घातला.तसेच त्याला पत्नी रूपाली, सासू आशाबाई रुस्तुम सुरवसे, सासरा रुस्तुम सुरवसे व मेहुणा पवन रुस्तुम सुरवसे यांनी मानसिक त्रास दिला. त्यामुळे नितीनने सासरवाडीतच विषारी द्रव प्राशन करून आत्महत्या केली.

याप्रकरणी नितीनचा भाऊ प्रशांत विनायक शेळके यांच्या फिर्यादीवरून सासरच्या मंडळीविरोधात बीडच्या दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

## पॉलिशच्या बहाण्याने दीड लाखांचे दागिने लंपास ; गुन्हा दाखल

सातपूर परिसरातील अशोकनगरमध्ये भांडी पॉलिश करण्याचे काम करणाऱ्या दोघांनी ६० वर्षीय महिलेचे १ लाख ५३ हजारांचे दागिने पॉलिश करून देण्याचे बहाण्याने लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी सातपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीमती दर्शना सुरेश गोयल (रा. मॉडन स्कूलच्या मागे, अशोकनगर, सातपूर) यांच्या फिर्यादीनुसार, गेल्या शुक्रवारी (ता. १५) सकाळी दहा-साडेदहा वाजेच्या सुमारास ३५ ते ४५ वयोगटातील दोन अज्ञात इसम भांडे पॉलिश करण्याचे काम करणारे आले होते. त्यांनी परिसरातील काही ग्राहकांची भांडी पॉलिश करून दिली. श्रीमती गोयल यांचीही भांडी पॉलिश केली.त्यावेळी संशयितांनी त्यांना, तुमच्याकडील सोने असेल तेही पॉलिश करून देणे असे म्हणून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांनीही घरातील १ लाख ५३ हजार ३०० रुपयांचे विविध प्रकारे सोन्याचे दागिने पॉलिश करून देण्यासाठी दोघा संशयितांकडे दिले.

## मुळुकवाडी ग्रामस्थांनी आपला संकल्प विकसित भारतकेंद्र सरकारची यात्रा वेशीवरुनच परत पाठवली:- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी लिंबागणेश

लिंबागणेश:- केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांचे फायदे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत या उद्देशाने आपला संकल्प विकसित भारत योजना दि.१५ नोव्हेंबर ते २६ जानेवारी कालावधीत देशव्यापी मोहीम केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येत असुन आज दि.१६ डिसेंबर शनिवार रोजी बीड तालुक्यातील मौजे.मुळुकवाडी याठिकाणी सकाळी यात्रा आली असता मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण देण्यात यावे या प्रमुख मागणीला पाठिंबा देण्यासाठी गेल्या १५ दिवसांपासून साखळी उपोषणास बसलेल्या ग्रामस्थांनी यात्रारथ गावच्या वेशीजवळ आल्यानंतर एक मराठा लाख




मराठा घोषणा देत मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत शासनाने आमच्या दारी येऊ नये म्हणत घोषणाबाजी करत परतुन लावला.यावेळी मराठा कुणबी आरक्षण प्रश्नावर ग्रामस्थांनी शासना विरोधात तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी सरपंच रामकिसन कदम, उपसरपंच पांडुरंग कानडे, भास्कर ढास, बालासाहेब ढास, प्रविण ढास,खंडु ढास,दादा कदम, वैजनाथ कदम, रघुनाथ ढास, रामहरी ढास,कृष्णा कदम,खंडु कोटुळे,दिलीप ढास, संभाजी भोसले, राजेंद्र ढास,बाळु ढास आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

मुळुकवाडी मधील ७५ टक्के शेतकरी कांदा उत्पादक असुन केंद्र सरकारच्या अकस्मात कांदा निर्यात बंदीच्या निर्णयानंतर कांद्याच्या दरात तब्बल अडीच ते ३ हजार रूपयांनी घसरण झाली असुन कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असुन शेतकऱ्यांच्या केंद्र सरकारविषयी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी उठवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## खेळता-खेळता चिमुकला पाण्यात पडला ; वाचवायला बहिणीनेही घेतली उडी, दोघांचाही बुडून मृत्यू

प्रतिनिधी जालना

शाळा सुटल्यानंतर घराबाहेर पडलेला ७ वर्षीय चिमुकला खेळता-खेळता एका खड्ड्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी १० वर्षीय बहिणीने देखील भरलेल्या डबक्यात उडी मारी. मात्र, पाणी जास्त असल्याने दोघांचाही बुडून मृत्यू झाला.ही दुर्देवी घटना छत्रपती संभाजीनगर शहरातील बजाजनगरमध्ये घडली. समर्थ राहुल देशमुख (वय ८ वर्ष) आणि चैतली राहुल देशमुख (वय १० वर्ष) अशी मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्या बहिण-भावंडाची नावे आहेत. ('साम टीव्ही'चं व्हॉट्सअँप चॅनल जॉईन करण्यासाठी येथे क्लिक करा)



या घटनेनं देशमुख कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राहुल देशमुख पत्नी आणि दोन चिमुकल्यांसह वाळूज महानगरातल्या बजाजनगरमधील इंद्रप्रस्थ कॉलनीमध्ये भाड्याने राहतात.त्यांना चैताली आणि समर्थ दोन मुले आहेत. चैताली चौथीत तर समर्थ दुसऱ्या वर्षात शिकत होता. गुरुवारी (१४ डिसेंबर) दुपारी ३ वाजेच्या सुमारास दोन्ही चिमुकले शाळा सुटल्यानंतर खेळण्यासाठी एमआयडीसीच्या मोकळा भूखंडावर गेले होते.भूखंडावर मुरूम उत्खनन केल्याने भलामोठा खड्डा पडला होता. या खड्ड्यात १० ते १५ फूट पाणी साचलं आहे. दरम्यान, खेळता-खेळता समर्थ पाण्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी चैतालीने देखील पाण्यात उडी घेतली.

मात्र, जवळ कुणीही नसल्याने दोघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. एका चिमुकल्याने ही घटना बघितल्यानंतर आरडाओरड केली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांनाही पाण्याबाहेर काढण्यात आले. मात्र, तोपर्यंत खूपच उशीर झाला होता. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली . विशेष म्हणजे ज्या खड्ड्यांमध्ये या चिमुकल्यांचा मृत्यू झाला तो खड्डा अनधिकृत बांधकामासाठी खोदण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे.

# इथेनॉल निर्मितीवरील बंदी अखेर मागे केंद्राचा इथेनॉल निर्मितीला हिरवा कंदील

प्रतिनिधी मुंबई

### ऊस उत्पादकांसह कारखानदारांना मोठा दिलासा

मुंबई : केंद्राने ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी घालण्याचा आपला निर्णय अखेर मागे घेतला आहे. यामुळे राज्यासह संपूर्ण देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह कारखानदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्राच्या निर्णयानुसार, साखर कारखान्यांना १७ लाख टन साखरेपासून इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी दिली आहे.

केंद्रानेग त ७ डिसेंबर रोजी एका परिपत्रकाद्वारे २०२३-२४ ऊसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मिती करण्यास बंदी घातली होती. हा निर्णय तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला होता. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल, असा दावा सरकारने केला होता. पण या



निर्णयाला देशभरातील ऊस उत्पादक शेतकरी व कारखानदारांनी कडाडून विरोध केला होता. राज्य सरकारनेही या प्रकरणी केंद्राकडे हा निर्णय मागे घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार, केंद्राने अवघ्या १५ दिवसांतच केंद्राने आपला मागे घेतला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केंद्राच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच हे उशीरा सूचलेले शहाणपण असल्याचा टोलाही त्यांनी सरकारला हाणला आहे.

इथेनॉल निर्मितीवर बंदी घालण्याचा निर्णय पूर्णतः चुकीचा होता. जगभरातील देशांनी एकत्र येऊन पर्यायी इंधन वापरण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे. सध्याच्या जीवाश्म इंधनाला इथेनॉल हा पर्याय आहे, असे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. केंद्राने १७ लाख टनापर्यंत साखरेचा इथेनॉल निर्मितीसाठी वापर करण्याची घातली आहे. राजू शेट्टी यांनी ही अट ३५ लाख टनापर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे.

# मराठा आरक्षणाला शरद पवारांचाच विरोध !

## देवेंद्र फडणवीस यांनी केले गंभीर आरोप

## त्यांच्यामुळेच दोन समाजात तेढ निर्माण झाल्याचाही केला दावा

मुंबई /वृत्तसंस्था

मराठा आरक्षणाला सर्वात मोठा विरोध शरद पवार यांनी केला असल्याचं गंभीर वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. शरद पवारांना मराठा समाजाला कधी आरक्षण द्यायचेचं नव्हते. स्वत:च्या नेतेपदासाठी शरद पवारांनी समाजांना झुंझवत ठेवल्याचे फडणवीस म्हणाले.

मराठा आरक्षणाशिवाय दुसरे प्रश्न नाहीत का? असं वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. शरद पवार यांच्या मनात असतं तर त्यांनी मंडल आयोगाच्या वेळीच मराठा समाजाला आरक्षण दिले असते असे फडणवीस म्हणाले. त्यांना कधी मराठा समाजाला आरक्षण द्यायचेच नव्हतं. त्यांना फक्त दोन समाजाला झुंझवत ठेवायचे होते असे म्हणत फडणवीसांनी शरद पवारांवर टीका केली.

महाराष्ट्रात ज्यावेळी आपलं सरकर होतं त्यावेळी आपण मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. ते सर्वोच्च न्यायालयात आपल्या सरकारच्या काळत टिकलं होतं अस फडणवीस म्हणाले. आत्तासुद्धा आम्ही मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. मात्र, हे आरक्षण देताना ओबीसींवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. काहीही झालं तरी चालेल असे फडणवीस म्हणाले. त्यांच्या आरक्षणावर संकट येणार नाही हे भाजपचं आश्वासन असल्याचे फडणवीस म्हणाले.

विरोधी पक्षांना देशाची, समाजाची चिंता नाही तर त्यांना त्यांच्या परिवाराची चिंता असल्याचे फडणवीस म्हणाले. आज आपण पाहत आहोत ते रोज भूमिका बदलत असल्याचे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रात उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांना फक्त सत्तेच्या राजकारणात आपलं अस्तित्व टिकवण्याची चिंता असल्याचे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या संदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी थेट शरद पवार यांच्यावरच गंभीर आरोप केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

# फडणवीसांनी विचारपूर्वक बोलावे

## तुम्ही कसा अन्याय करत आहात हे मराठा समाजाने मनात कोरून ठेवले आहे, मनोज जरांगे यांचा इशारा

छत्रपती संभाजीनगर -मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या मुद्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा एकदा निर्वाणीचा इशारा दिला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी विचारपूर्वक बोलावे. त्यांनी मराठा समाजाविषयी चांगले शब्द वापरावेत. तुम्ही कशा पद्धतीने अन्याय करत आहात, हे मराठा समाजाने आपल्या मनात कोरून ठेवले आहे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही निशाणा साधला.

मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी येथील एका रुग्णालयात पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर तिखट हल्ला चढवत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निर्वाणीचा इशारा दिला. जरांगे भुजबळांवर हल्ला चढवत म्हणाले की, तुम्ही अनेकांना अंगावर घेतले असेल. पण माझ्या नादी लागू नका. त्यांनी त्यांच्या वाट्याचे खावे. उगीच झाडी की पत्ती वगैरे म्हणून शेरोशायरी करू नये. ते खोटे बोलून स्वतःची सुरक्षा वाढवून घेत आहेत.

### त्याला कितीही वळवळ करू द्या

मराठ्यांच्या हजारो कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे मराठे खऱ्या अर्थाने ओबीसीच आहेत. आम्ही तुमच्यावर अद्याप कोणतेही आरोप केले नाहीत. त्याला (छगन भुजबळ) कितीही वळवळ करू द्या. सरकारने त्याचे ऐकून मराठा समाजावर खोट्या केसेस दाखल करू नये. त्यांना संताजी - धनाजी सारखा मी आणि मराठा समाज पाण्यात दिसत आहे, असे मनोज जरांगे यावेळी म्हणाले.

मंत्री छगन भुजबळ यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना अडचणीत आणण्याचा डाव असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.



देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत बोलताना मराठा आंदोलकांवरील सरसकट गुन्हे मागे घेण्यास नकार दिला. मनोज जरांगे यांनी यावर भाष्य करताना त्यांना निर्वाणीचा इशारा दिला. फडणवीस यांनी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार त्यांना गुन्हे मागे घ्यावेच लागतील. सध्या निष्पाप लोकांवरही गुन्हे दाखल करून त्यांना गजाआड केले जात आहे. मराठा आंदोलन बदनाम करण्यासाठी हे घडवले जात आहे, असे ते म्हणाले.

## शिक्षकांची सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.अच्युतराव देशमुख यांचा हृदयपुर्वक सत्कार संपन्न



केज । प्रतिनिधी

शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित केज, या पतसंस्थेचे माजी अध्यक्ष म्हणजेच शिक्षक सहकारी पतसंस्था संस्थापक,श्री अच्युतराव देशमुख गुरुजी (अण्णा) वरपगावकर.यांनी पतसंस्थेसाठी अपार कष्ट घेऊन केज मध्ये शिक्षक पतसंस्थेची स्वतःची जागा निर्माण करून पतसंस्था चालू केली.व या छोट्याशा पतसंस्थेच्या रोपट्याचे आता मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. त्यामुळे चालू संचालक मंडळ यांनी श्री.अच्युतराव देशमुखगुरुजींचा यथोचीत सत्कार करण्याचे ठरवले . कारण त्यांची अशी इच्छा होती की,पतसंस्था संबंधी काही कागदपत्रे होती ती योग्य अशा या संचालक मंडळाकडे सुपुर्द करायची होती.व त्यांनी दिनांक १३ डिसेंबर २०२३ रोजी देशमुख गुरुजींचा शिक्षक पतसंस्थेमध्ये यथोचीत सत्कार केला.त्यानिमित्त परिचय करून देताना पतसंस्थेचे संचालक अंबादासजी काळे सर त्याच बरोबर पतसंस्थेचे अध्यक्ष काळे सर,सचिव गलांडे सर,संचालक श्री.जगदाळे सर,संचालक श्री.अनिल ठोंबरे सर,श्री. अनिल कोरडे सर,श्री. अरुण पवार सर तसेच पतसंस्थेतील कर्मचारी बळीराम जाधव सर व थोरात सर,तसेच वर्षा जनरलचे प्रोप्रायटर बाळासाहेब देशमुख,व त्यांचे पुतणे,फुलचंद दादा देशमुख,हरिनाना देशमुख, व इतर सर्व शिक्षक बंधू यावेळी उपस्थित होते. त्या वेळेस गुरुजींनी म्हणजेच अण्णांनी पतसंस्था कशी सुरू केली ? त्यासंबंधी माहिती दिली.सर्वप्रथम त्यांनी दिव्यांग शिक्षक यास प्रथम इ.स.१९९० ला २०० रूपये कर्ज वाटप केले.त्यावेळेस कोण कोणत्या अडचणी आल्या व कर्ज देताना व्यसनी लोकांच्या हातात कर्ज न देता त्यांच्या अर्धांगिनी, माऊलीच्या हातात देत असत हेही त्यांनीआवर्जुन नमूद केले.असे चांगले निर्णय घेतले आहे असे त्यांनी संगितले

# केज तालुक्यातील कुंबेफळ येथे संध्या थोरात यांचा नागरी सत्कार संपन्न

**केज । प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यां मध्ये जिद्द चिकाटी कष्ट करण्याची हिम्मत आहे,या जोरावर गुणवत्ता मिळवून विद्यार्थी यश मिळवू शकतात प्रयत्नाने यश मिळतेच. अभ्यासातून यशाची वाट सापडेल असे मत डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.ते केज तालुक्यातील कुंबेफळ येथील संध्या व्यंकटराव थोरात यांची सहाय्यक सहकारी अधिकारी वर्ग-२ या पदावर निवड झाली.**

या यशाबद्दल ग्रामपंचायत व गावकऱ्यांच्या वतीने आई वडीलांसह संध्या थोरात चा नागरी सत्कार करण्यात आला.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणूनबोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन रतनराव थोरात, प्रमुख पाहुणे डॉ.हनुमंत सौदागर,प्रमुख उपस्थिती बालासाहेब थोरात, ग्रामपंचायतचे सरपंच अविनाश पांचाळ,सुरेश थोरात,प्रकाश थोरात, श्रीकृष्ण थोरात,सिद्धि विनायक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.डिसले सर,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. गायकवाड,उपसरपंच पती विष्णू थोरात,ग्राम सेवक श्रीमती भोसले, संदीप थोरात आदींची उपस्थिती होती.उपस्थित गावकऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.संध्या थोरात यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करून यश मिळवले याबाबतचे अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडताना संध्या थोरात म्हणाल्या की,मी याच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकले.कधीही परिस्थिती चे पांघरून घेतले नाही. कायम अभ्यास



### अभ्यासातून यशाची वाट सापडेल -डॉ.हनुमंत सौदागर

करून ध्येयाच्या दिशेने पुढे गेले. या यशामध्ये आई-वडिलांचा मोलाचा वाटा आहे असे मत व्यक्त केले. पुढे बोलतांना डॉ.हनुमंत सौदागर म्हणाले की, ग्रामीण भागात गुणवत्ता आहे प्रयत्न आणी जिद्द ठेवल्यास यश प्राप्ती होते. स्वतःच्या मनात न्यूनगंड बाजूला ठेवून दिशा ठरवून अभ्यास करावा असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्तविकातून विष्णू थोरात म्हणाले की, संध्याने गावाचे नाव उज्वल केले.




# मराठी चित्रपट घुंगरू पहिल्या दिवशी चार शो हाउसफुल

परळी (प्रतिनिधी)

शहरातील गुणवंत कलाकारांची निर्मिती असलेल्या घुंगरू मराठी चित्रपट आज महाराष्ट्रात सुमारें १०५ चित्रपट गृहात प्रदर्शित झाला. त्याला आज भरघोस ओपनिंग मिळाले. संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या अदाकारीने वेड लावणाऱ्या आणि आपल्या ठुमक्यावर थिररकवणाऱ्या प्रसिद्ध लावणी कलाकार गौतमी पाटील ची यात मुख्य भूमिका आहे. दि.१५ डिसेंबर रोजी परळी शहरातील श्री चित्रमंदिर येथे या चित्रपटाचा शुभारंभाचा पहिला खेळ दणक्यात संपन्न झाला. दरम्यान या चित्रपटाचे दिवसभरातील चारही शो हाउसफुल झाले आहेत. या चित्रपटाचा प्रारंभी परळीतील कलाकारांनी शहरात मोठी फेरी काढून वाजत गाजत परळी शहरातील श्रीनाथ चित्रमंदिर येथे येऊन मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढऊन तिकीट विक्रीस सुरुवात केली.मिळते आहे.

# सतीश आठवले च्या अथक परिश्रमाला अखेर आले यश

## प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत स्कॉटलंड विद्यापीठात प्रथम श्रेणीत पदवी प्राप्त

**निफाड । प्रतिनिधी**

सध्याच्या विज्ञान तंत्रज्ञानाचे युगात व स्पर्धेच्या एकंदरीत युगाचा विचार करता गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण घेणं जिकिरीचे होत असले तरीही काही विद्यार्थी आपल्या एकंदरीत प्रतिकूल परिस्थितीचा व आई-वडिलांनी केलेल्या मेहनतीचा विचार करत आपली ध्येय गाठण्यासाठी जीवाची पराकाष्टा करत असतात. अश्या च एका ध्येयवेड्या तरुणाने आपली उराशी असलेले स्वप्न सत्यात उतरवून आई-वडिलांनी दिलेल्या संस्काराचे व मेहनतीचे फळ मिळवून देण्यात यशस्वी झाला आहे. तरुणांसाठी प्रेरणादायी असलेले उदाहरण म्हणजे सणसवाडी येथील सतीश आठवले---

अखंड महाराष्ट्रभर वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसाराचे कार्य करणाऱ्या विठ्ठल रखुमाई अध्यात्मिक विचार मंच च्या सदस्य सौ रमाताई अशोक आठवले व शिक्रापूर पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते बौध्द वासी विठ्ठल धर्माजी आठवले यांचे नातु व अशोक आठवले यांचे चिरंजीव सतीश अशोक आठवले यांनी लंडन (युके) स्कॉटलंड मध्ये ' विज्ञान डिस्टीलींग उद्योजकता' या विषयावर हेरी ओट वॉट विद्यापीठात प्रथम श्रेणी पदवी प्राप्त केली आहे अशी माहिती विठ्ठल रुक्माई ग्रुपच्या मुख्य सदस्या सौ रीनाताई राजेंद्र सोनवणे यांनी दिली आहे.

सतीश आठवले यांनी सणसवाडी जिल्हा परिषद शाळेतून प्राथमिक शिक्षण घेतले. सहावी ते बारावी पर्यंतचे शासकीय जवाहर नवोदय विद्यालयातून धडे गिरवले. उच्च शिक्षित होण्याचे स्वप्न उराशी बाळगून सतीशने मुंबई येथील भारती विद्यापीठात इंजिनीअरिंग करीता प्रवेश मिळविला होता तेथे चार वर्षांचे शिक्षण २०२० मध्ये पूर्ण केले. दरम्यान कोविडमुळे शेवटची परीक्षा ऑनलाइन झाली. निकाल देखील उशिरा जाहीर झाला त्यानंतर सतीशने यूकेमधील विद्यालयांच्या वेबसाइटवर माहिती तसेच शालेय कागदपत्रे अपलोड करत प्रवेशासाठी प्रयत्न केले. मे २०२१ सतीश ची यूके( स्कॉटलंड) मधील विज्ञान डीस्टीलिंग उद्योजकता या उच्च पदवीधर शिक्षणासाठी निवड झाली होती.




### सतीश चा आमच्या आठवले परिवाराला सार्थ अभिमान

सतीश ने लहानपणापासूनच उच्च पदावर जाण्यासाठी शिक्षण घेण्याचा ध्यास बाळगला होता आणि त्यासाठी आपली स्वप्न उराशी बाळगून तो अत्यंत मेहनतीने व परिस्थितीवर मात करत सातत्याने अभ्यास करत यशाला गवसणी घालत आमच्या आठवले कुटुंबीयांचा नावलौकिक वाढविला असून त्याला पुढील भविष्यासाठी आई-वडिलांकडून खूप खूप शुभेच्छा...

**सतिश चे वडील - अशोक विठ्ठल आठवले,**
**सतिश ची आई- सौ रमाताई अशोक आठवले (शिक्रापूर) पुणे**

# लग्नाच्या वऱ्हाडावर काळाचा घाला, नागपुरात भीषण अपघातात सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू

**नागपूर जिल्ह्यातील काटोलमध्ये क्वॉलीस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे. काल (शुक्रवारी) मध्यरात्री काटोल तालुक्यातील सोनखांब आणि ताराबोडी दरम्यान ही घटना घडली.**

क्वालीस गाडी नागपूरवरून काटोलच्या दिशेनं जात असताना ट्रकनं गाडीला जोरदार धडक दिली आणि भीषण अपघात झाला. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे. नागपुरात एका लग्नाचा कार्यक्रम आटपून हे सर्वजण काटोलच्या दिशेनं जात होते त्यावेळी भीषण अपघात झाला. जखमीला नागपुरातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

अपघातातील मृतांची नावे :
अजय दशरथ चिखले (वय ४५)
विठ्ठल दिगंबर थोटे (वय ४५)
सुधाकर रामचंद्र मानकर (वय ४२)
रमेश ओंकार हेलोंडे (वय ४८)
मयूर मोरेश्वर इंगळे (वय २६)
वैभव साहेबराव चिखले (वय ३२)

मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. एका क्वॉलीस कारमधून सात जण नागपूरहून काटोलच्या दिशेनं प्रवास करत होते. नागपुरात एका लग्नाही हे सातही जण उपस्थित राहण्यासाठी आले होते. रात्री उशीरा



नागपुरातील लग्नाचा कार्यक्रम आटपून सातहीजण आपल्या घरी निघाले होते. पण रस्त्यातच त्यांच्यावर काळानं घाला घातला. नागपूरहून काटोलच्या दिशेनं जात असताना समोरून येणाऱ्या एका ट्रकनं क्वॉलीस गाडीला धडक दिली.

ट्रकन क्वॉलीस गाडीला जोरदार धडक दिल्यानं भीषण अपघात झाला. अपघातात क्वॉलीस गाडीतील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. नागपुरातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात ट्रॉमा सेंटरमध्ये जखमीवर उपचार सुरू आहेत. ट्रकची धडक एवढी जोरदार होती की, या अपघातात क्वॉलीस गाडीचा चक्काचूर झाला आहे.

अपघाताची माहिती मिळताच तात्काळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केलं. काही स्थानिकांनीही घटनास्थळी धाव घेत बचाव कार्यात मदत केली. क्वॉलीस गाडीतील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आणि त्यांची ओळख पटवून त्यांच्या कुटुंबीयांना अपघातासंदर्भात माहिती देण्यात आली. तर अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तिला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्याच्यावर सध्या नागपुरातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT